पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

Telephone No. 0217-2744777-135, Website : sus.ac.in
Email Id : convocation@sus.ac.in

**परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत विभाग / Convocation Department)**

जा.क्र. पुअहोसोविसो/प.व.मू.मं/दीक्षांत/२०२६/ 1019 दिनांक : - 1 JUL 2026

# परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून ते सत्र ऑक्टोबर २०२१ पर्यंत प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील व विद्यापीठ परिसर संकुलातील विविध अभ्यासक्रमांमध्ये उत्तीर्ण असणाऱ्या परंतू आजतागायत ज्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी विद्यापीठाकडे अर्ज केलेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना या परिपत्रका अन्वये कळविण्यात येते की, दि. ०१ जूलै, २०२६ ते १३ जूलै, २०२६ या दरम्यान आपण विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी विहित शुल्क भरुन २२ व्या दीक्षांत समारंभाकरिता अर्ज करु शकता.

दि. ०१ जूलै, २०२५ पासून विद्यापीठामध्ये येऊन पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणेची सुविधा बंद करण्यात आलेली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी sus.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरुन विद्यार्थी सहाय्यता केंद्रांतर्गत (Student Facilitation Centre) ऑनलाईन पध्दतीने पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज विद्यापीठास सादर करावा.

दि.०१ जूलै, २०२६ ते १३ जूलै, २०२६ यादरम्यान तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळण्याची सुविधा बंद राहील.

दि. १४ जूलै,२०२६ पासून तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करण्याची ऑनलाईन सुविधा विद्यार्थी सहाय्यता केंद्रांतर्गत (Student Facilitation Centre) सुरु होईल. दि. ०१ ऑगस्ट, २०२५ पासून तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करण्याची ऑफलाईन सुविधा बंद करण्यात आली आहे.

सबब, सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करणेकरिता विद्यापीठामध्ये येण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त प्रमाणे ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा sus.ac.in या संकेतस्थळावर (Student Facilitation Centre) या मथळयाखाली उपलब्ध आहे. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची अथवा कागदपत्रांची छायांकित प्रत (Hard Copy) विद्यापीठामध्ये जमा करण्याची आवश्यकता नही याची नोंद घ्यावी.

**आदेशान्वये,**

**(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:- मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/ विद्यापीठ संकुले यांना या परिपत्रकाची प्रत देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.